९ब अभिमानश्री, सोसायटी
पुणे ४११००८

२५/३/०५

श्री दिवाकर बोकरे यांस

स. न. वि. वि.

आपला किर्लोस्कर मधील लेख वाचला. चालू भोगवाद, चंगळवाद या गोष्टी माझ्या मते आधुनिक तंत्रज्ञानाचे स्वरूप न ओळखता टिकविण्या-साठी केलेली केविलवाणी धडपड आहे. या दृष्टिकोनामागील कारणमीमांसा आणि मी केविलवाणी धडपड का म्हणतो, याचा खुलासा खालीलप्रमाणे :

दुसऱ्या जागतिक महायुद्ध काळात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जे निरनिराळे शोध लागले, त्यांनी मानवी उपक्रमांचे परिमाण (स्केल) प्रचंड वाढविले. मोठ्या प्रमाणावर उत्पादन (मास प्रॉडक्शन) शक्य झाले. त्याबरोबर हे प्रचंड उत्पादन कसे खपवायचे ही समस्याही निर्माण झाली. तेव्हा आधुनिक तंत्रज्ञानाला समांतर अशी आधुनिक व्यवस्थापन पद्धती हार्वर्ड विद्यापीठाने पुढे आणली. १९७३-७४ पर्यंत खनिज ऊर्जा स्रोत (तेल, कोळसा वगैरे) अत्यंत कमी दरात पाश्चात्य राष्ट्रांना उपलब्ध होते. त्यामुळे एकूण मानवी गरजा अनंत असू शकतात आणि त्या पुरविणे, त्यासाठी उत्पादन अनंत पटीने वाढविणे शक्य आहे (आधुनिक तंत्रज्ञाना-च्या प्रगतीमुळे) या गृहितकावर १९५० नंतरची भौतिक प्रगती आधारली गेली. दूरचित्रवाणी, जाहिरात यांची विविध तंत्रे यांचा उपयोग करून मानवी गरजा चेतविणे, आणि त्यासाठी विविध प्रकारची जीवनावश्यक नसलेली उत्पादने बाजारात आणून विकणे, हेच अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट बनले. यामध्ये समाजाच्या संपत्तीचे विभाजन समानतेच्या तत्त्वावर झाले

पाहिजे, याकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यात आले.

उत्पादनात कोणतीच मर्यादा न पाळल्यामुळे प्रदूषणाच्या विविध समस्या निर्माण झाल्या, तसेच भौतिकशास्त्राचे नियम डावलल्यामुळे (Laws of Thermodynamics) जसा ऊर्जा व द्रव्य (मॅटर) यांचा वापर वाढत गेला, तसे उत्पादनखर्च वस्तूंच्या किंमतीपेक्षा जास्त होऊ लागला. म्हणजेच हे अवाजव्य उत्पादन चालू ठेवणे म्हणजेच अधिकाधिक तोटा पदरात घेणे, असा त्याचा अर्थ झाला. एकूण अर्थव्यवस्था तोट्याची होऊ लागली (Deficit economy). प्रत्येक समस्येला तंत्रज्ञानात उत्तर सापडेल आणि तंत्रज्ञान प्रसंगी प्रतिसृष्टी निर्माण करू शकेल अशा गाढ्या विश्वासाने अर्थव्यवस्थेत योग्य त्या सुधारणा न करता, सरकारी अनुदाने, निसर्गाकडून मोफत मिळविलेल्या सुविधा आणि विषमता वाढवून ठेवून, समाजातील वर्गांना वंचित ठेवून, त्यांच्या जीवनावश्यक गरजा व मागणीला, संसाधने अतिरिक्त वस्तूंना उत्पादनाकडे वळविण्यात आली. यालाच आपण चंगळवाद, भोगवाद म्हणतो. आज याच्या मुळाशी तंत्रज्ञाना-वरील गाढा विश्वास आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

१९७३-७४ मध्ये तेलउत्पादक राष्ट्रांनी किंमती वाढविल्यामुळे तर या अर्थव्यवस्था अधिकच तोट्याच्या झाल्या. प्रचंड कर्जे काढून, Mergers, Amalgamations करून, स्पर्धा मारून, या तोट्याच्या व्यवस्थेने प्रचंड कॉर्पोरेशन्सना जन्म दिला. जगातील कोणत्याही प्रदेशातून संसाधने मिळवून ही अर्थव्यवस्था चालू ठेवण्याची शक्ती या महाकॉर्पोरेशन्स-ना प्राप्त झाली आणि त्याचबरोबर, स्वार्थपूर्तीसाठी जागतिकीकरणाचे तत्त्वज्ञान

जगाच्या माथी मारण्यात आले.

अशा विघातक अर्थव्यवस्थेला विरोध सुरू झाला, १९७०च्या दशकाच्या अखेरीला. १९८४ मध्ये डॉ नरिंदर सिंग यांनी त्यांच्या Economics & Crisis of Ecology या ग्रंथाद्वारे या विरोधाला भारतात वाचा फोडली. अमेरिकेत हरमन डाली, केनेथ बोल्डिंग, जॉर्जेस्क्यू रोजेन, एहर्लिच पतिपत्नी, प्रायर्स हे अर्थतज्ञ, तसेच अलीकडे प्रिगॉझिन हे नोबेल पारितोषिक विजेते, या अर्थव्यवस्थेचे घातक स्वरूप विशद करीत आहेत. मात्र आधुनिक शास्त्र व तंत्रज्ञान यांवरील भाबड्या विश्वासामुळे प्रगत आणि अप्रगत देशांतही हीच अर्थव्यवस्था चालू आहे. तंत्रज्ञान हा निसर्गाला पूर्ण आणि पुरेसा पर्याय आहे, अशी श्रद्धा असल्याने निसर्गाचा नाश अव्याहत चालू आहे. त्यावर ज्यांची उपजीविका अवलंबून आहे, असे हजारो लोक आज दारिद्र्याच्या खाईत लोटले जात आहेत.

मी केविलवाणी धडपड म्हणतो कारण हा डोलारा आता निसर्गाच्या शोषण व विरूद्ध पायावर उभा आहे. तो केव्हातरी कोसळणार हे उघड होते आणि तीच गोष्ट कमीअधिक प्रमाणात आज निरनिराळे देश अनुभवित आहेत. सर्वांना केवळ खर्चाची सवय लागल्याने बचत होत नाही, आणि कर्ज काढून सर्व व्यवहार चालतात. अलीकडे नवी दिल्लीहून प्रसिद्ध झालेल्या दोन अहवालांत (Disequalising growth आणि Decline of the Development State) हे आपण पाहिले नसल्यास जरूर पहावे. (Alternative Survey Group या अर्थतज्ञांच्या गटाने ते प्रसिद्ध केले आहेत) भारतातील स्थितीचे चित्रण आहे.

आपण एका महत्त्वाच्या विषयावर लिहिलेत हे चांगले झाले. या अर्थव्यवस्थेचा जेवढा विरोध होईल, तेवढा हवा आहे. कळावे, लो. अ. लोभ.

प्रकाश गोळे